# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
(ISO 9001:2008 प्रमाणित)
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०
http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/२४०२
दिनांक :- 28 JUN 2017

प्रति,
**प्राचार्य,**
पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमाचे सुविधा केंद्र व प्रवेश निश्चिती केंद्र
(Facilitation Center व Admission Reporting Center)
**औरंगाबाद विभाग**

**विषय :- सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना योजनांची माहिती करून देणे बाबत..**
संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/ईबीसी/२०१७/८२ दिनांक ०९/०६/२०१७

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना बाबतची माहिती Facilitation Center व Admission Reporting Center यांनी विद्यार्थी व पालक यांना करून देण्यात यावी.

या पत्रान्वये आपणास सुचित करण्यात येते की, सोबत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना बाबतची माहिती या सोबत जोडण्यात येत असून,सदरील माहिती इमारतीच्या दर्शनी जागेवर लावण्यात येवून त्या बाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी. जेणे करून सदर योजनांचा लाभ संबंधित विद्यार्थ्यांना घेता येईल.

सोबत :- वरील प्रमाणे

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत :- १. **मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

# महाराष्ट्र शासन
# उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

- मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमांत प्रवेश घेणारे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नयेत म्हणून, एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय.
- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लाखापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून घेतल्यास त्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० % शिष्यवृत्ती म्हणून अदा करण्यात येईल.
- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलंग्नित बँक खात्यामध्ये शिष्यवृत्ती स्वरुपात जमा करण्यात येईल.
- पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा :-
  अ) रु.२.५० लाख व त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी/बारावी) गुणांच्या टक्क्यांची अट लागू नाही.
  ब) रु.२.५० लाखापेक्षा अधिक ते रु.६.०० लाखा पर्यंत वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी/बारावी) गुण ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक.

## ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

- दि. १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यात आली असून राज्यातील अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिवर्ष रु.३०,०००/- व इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना रु.२०,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता आधार संलंग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

❖ टिप:- योजने बाबतची पात्रता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळ- www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध.